# राजर्षी शाहू महाराजांचा वारसा पुढे चालवूया, सामाजिक न्यायाचा जागर करूया!



**सामाजिक न्याय, समता, स्त्री-स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते, आरक्षणाचे जनक**
**राजर्षी शाहू महाराजांना**
**151 व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!**

राजर्षी शाहू महाराजांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय या मूल्यांची अंमलबजावणी त्यांच्या काळातच केली होती. त्यांच्या कार्यामुळे भारतीय संविधानात समता आणि सामाजिक न्यायाचे महत्त्व अधिक स्पष्ट झाले.

## शाहूकार्यातील 'सामाजिक न्याय'

मानवतेवर कलंक असलेली अस्पृश्यता नष्ट केली पाहिजे, असे शाहू महाराजांचे मत होते. त्यांनी तथाकथित अस्पृश्यांच्या मुलांसाठी मोफत प्राथमिक शिक्षणाची, राहण्याची व जेवणाची व्यवस्था केली. तसेच त्यांना शिष्यवृत्तीही दिली.

मागासवर्गीयांसाठी नोकरीत 50% आरक्षण लागू केले. अस्पृश्यतेविरुद्ध कायदे करून सामाजिक भेदभावाला आळा घातला. अस्पृश्य आणि मागासवर्गीय शेतकऱ्यांना शेतीसाठी जमीन दिली.

शाहू महाराजांनी भारतात सामाजिक न्यायाचा पाया घातला.

## शाहूकार्यातील 'समता'

शाहू महाराजांनी सर्व जातींना एकत्र आणण्यासाठी सामाजिक समारंभ आयोजित केले, ज्यामध्ये सर्व जातींचे एकत्र जेवत असत. यामुळे सामाजिक एकतेचा संदेश गेला. त्यांनी आपल्या प्रशासनात सर्व जाती-धर्मांना प्रतिनिधित्व दिले, ज्यामुळे समतेचे मॉडेल निर्माण झाले. मिश्रविवाह तसेच आंतरजातीय विवाह व्हावेत याला प्रोत्साहन देणारा कायदा सुरू केला. स्वतःच्या चुलत बहिणीचा आंतरजातीय विवाह लावून दिला.

## शाहूकार्यातील 'स्त्री-पुरूष समानता'

शाहू महाराजांनी महिलांना शिक्षण देण्यासाठी स्वतंत्र शाळा आणि वसतिगृहे उभारली. शिक्षणाद्वारे स्त्रियांना सक्षम करण्यावर भर दिला. सोबतच विधवा पुनर्विवाहाला कायदेशीर मान्यता दिली, घटस्फोटाचा अधिकार दिला आणि बालविवाह रोखण्यासाठी कमालीचे प्रयत्न केले. मुलांच्या लग्नाचे वय वाढवण्याचा कायदा केला. त्यातही लग्नासाठी मुलीचा होकार महत्वाचा होता. कौटुंबिक छळविरोधी कायदा केला.

महिलामुक्तीच्या दिशेने टाकलेले अजुन एक पाऊल म्हणजे त्यांनी देवदासी प्रथेवर बंदी घातली. स्त्रियांना मालमत्तेचा हक्क देणारा कायदा केला.

## राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य



महात्मा फुले यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचा वारसा राजर्षी शाहू महाराजांनी पुढे नेला. कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे केले. सर्व जाती-धर्माच्या विद्यार्थ्यांसाठी जातीनिहाय वसतिगृहे काढली. स्वतःच्या खर्चाने अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी परदेशात पाठवले. औद्योगिक आणि तांत्रिक शिक्षणाला प्रोत्साहन दिले.



## शाहूकार्यातील 'धर्मनिरपेक्षता'

नागपूर येथे झालेल्या अखिल भारतीय बहिष्कृत समाज परिषदेतील भाषणात शाहू महाराज म्हणतात, "आम्ही सर्व हिंदी आहोत, बंधू आहोत. हिंदी प्रजाजन कोणत्याही वर्णाचे असोत, कोणत्याही धर्माचे असोत, ते सर्व हिंदी आहेत. व्यक्तीच्या दृष्टीने धर्माची बाब महत्त्वाची असेल, पण राष्ट्रीय बाबतीत ती केव्हाही आड येता कामा नये. यापुरती धर्म ही बाब फारच कमी महत्त्वाची आहे असे मला वाटते."

त्यांनी सर्व धर्मांच्या लोकांना प्रशासनात सामावून घेतले आणि धार्मिक भेदभावाला स्थान दिले नाही. सर्व धर्मांच्या नेत्यांना एकत्र आणून धार्मिक सहिष्णुतेचा संदेश दिला, ज्यामुळे कोल्हापूरात शांतता आणि एकता कायम राहिली.

## राजर्षी शाहू महाराजांचे 'कल्याणकारी राज्य'



राजर्षी शाहू महाराजांनी व्यापारवाढीसाठी 'शाहूपुरी' ही व्यापारी पेठ सुरू केली. स्वस्तात धान्य उपलब्ध करून दिलं. लोकांच्या औषधोपचाराची सोय केली. अनाथालयं सुरू केली आणि मुलांच्या पालनाची सोय केली.

शेतकऱ्यांना सावकारांच्या जाचातून मुक्त केले. सहकारी संस्थांची स्थापना केली. त्यामार्फत स्वस्तात कर्जे दिली. दुष्काळ किंवा नापिकीच्या काळात करमाफी आणि सवलती जाहीर केल्या. रोजगार हमी सुरू केली.

कोल्हापूरची पाण्याची आणि सिंचनाची गरज भागवण्यासाठी पंचगंगा नदीवर धरण, तलाव, कालवे तसेच राधानगरी धरण प्रकल्प हाती घेतला.

वस्त्रोद्योगाला चालना देण्यासाठी शाहू छत्रपती स्पिनिंग एंड व्हिविंग मिल स्थापन केली.
शाहू राजवटीत कोल्हापूर-बेळगाव रस्ता, कोल्हापूर-मिरज नवीन रेल्वे मार्ग सुरू झाला.
जनतेच्या शारीरिक तंदुरुस्तीसाठी कुस्तीला प्रोत्साहन दिले, खासबाग मैदान बनवले.




## राजर्षी शाहू महाराजांचा वारसा आणि भारतीय संविधान

राजर्षी शाहू महाराजांनी न्याय, सर्वधर्म समभाव, जनतेचे कल्याणासाठी राज्य या धोरणांना अनुसरूनच राज्य चालवले. छत्रपती शाहू महाराजांच्या कार्याचे प्रतिबिंब भारतीय संविधानात स्पष्टपणे दिसून येते. शिव-शंभू-फुले-शाहूंच्या विचारांचा हाच वारसा पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानात अंतर्भूत केला. आपण सर्व जण याच विचारांचे वारस आहोत. आपल्या आयुष्यात आतापर्यंत जे काही चांगलं झालं आहे ते या विचारांमुळेच झालं आहे.

हाच विचार प्रत्येकापर्यंत पोहोचवण्यासाठी **'संविधान जागर अभियान'** सुरू करण्यात आले आहे. तुम्हीही यामध्ये सहभागी व्हा, असे प्रेमपूर्वक आवाहन! चला तर मग, समता, न्याय, बंधुता, स्वातंत्र्य, जनतेच्या कल्याणाचा विचार जपूया, पसरवूया आणि वाढवूया.

# संविधान जागर अभियान

स्वप्निल फुसे: 79723 45764 | नागार्जुन वाडेकर: 98602 39899 | राजाभाऊ करवाडे: 98222 02739
samvidhanjagar.org